<u>प्रसिध्दी पत्रक</u>                    दिनांक 22/08/2025

आरोपी लोकसेवक 1) श्रीमती शोभा मिठू आहेरकर, पद सफाई मजूर, ने. म.न.पा कार्यालय झोन क्रमांक. 09 2) श्रीमती वर्षा वसंत महिरे, पद सफाई मजूर ,ने.म.न.पा कार्यालय झोन क्रमांक 9 ,छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रारदार यांच्या मुलांच्या जन्म प्रमाणपत्रातील नावामध्ये दुरुस्ती करण्यासाठी 2,000/- (दोन हजार रुपये) रुपये लाच स्विकारल्याने दोन्ही महिला आरोपी लोकसेवक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पोलीस ठाणे जिन्सी, छत्रपती संभाजीनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे. |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | **आरोपी लोकसेवक** - 1) श्रीमती शोभा मिठू आहेरकर, वय 56 वर्ष, व्यवसाय ,नोकरी पद सफाई मजूर, ने. म.न.पा कार्यालय झोन क्रमांक. 09 रा. राहुल नगर, रेल्वे स्टेशन शासकीय निवासस्थान म.न.पा छत्रपती संभाजीनगर.(वर्ग 4 )<br>2) श्रीमती वर्षा वसंत महिरे, वय 36 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद सफाई मजूर ,ने.म.न.पा कार्यालय झोन क्रमांक 9 रा. शासकीय निवासस्थान कोटला कॉलनी च्या बाजूला पाण्याच्या टाकीजवळ आदालत रोड छत्रपती संभाजीनगर (वर्ग 4 ) |
| लाच मागणी रक्कम | 3,000/- (तीन हजार रुपये) |
| लाच स्विकृती रक्कम | 2,000/- ( दोन हजार रुपये) |
| सापळा अधिकारी<br>सहाय्यक सापळा अधिकारी | श्री. धर्मराज बांगर, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर<br>श्री. वाल्मीक कोरे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांच्या मुलांच्या जन्म प्रमाणपत्रातील नावामध्ये दुरुस्ती करण्यासाठी तक्रारदार यांनी झोन क्रमांक 09 म.न.पा कार्यालय मोंढा नाका येथे अर्ज दाखल केला होता. सदर जन्म प्रमाणपत्रातील नाव दुरुस्तीसाठी आलोसे तक्रारदाराकडे लाच मागणी करीत असल्याची तक्रार दिनांक 22/08/2025 रोजी ला प्र वि कार्यालय छत्रपती संभाजी नगर येथे समक्ष हजर राहून तक्रारदार यांनी दिली होती. |
| थोडक्यात माहिती | दिनांक 22/08/ 2025 रोजी तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीची शासकीय पंच समक्ष आलोसे यांच्याकडे तक्रारदारास पाठवून पडताळणी केली असता आलोसे क्रमांक 1 यांनी तक्रारदार यांच्याकडे जन्म प्रमाणपत्रातील नाव दुरुस्ती करून देण्यासाठी 3000/- हजार रुपयाची लाच मागणी करून तडजोडी अंती 2000/- हजार रुपये स्वीकारण्याचे कबूल केले. तसेच आलोसे क्रमांक 2 यांनी आलोसे क्रमांक 1 यांना लाच मागणीस प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले. आलोसे यांच्या लाच मागणी पडताळणी नंतर दिनांक 22/08/2025 रोजी शासकीय पंच समक्ष म.न.पा कार्यालय , झोन क्रमांक 09 मोंढा नाका या ठिकाणी सापळा कारवाई आजमावली असता आलोसे क्रमांक 1 यांना तक्रारदार यांच्याकडून 2000/- रुपयांची लाच रक्कम स्वीकारली. सदर वेळी आलोसे 1 आणि 2 यांना पंचा समक्ष रंगेहाथ पकडण्यात आले आहे.<br>आलोसे यांचे राहते घराची घरझडती घेण्याची प्रक्रीया सुरु आहे तसेच आलोसे यांच्या विरोध्द पोलीस ठाणे जिन्सी, छत्रपती संभाजीनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु असुन नमुद गुन्हयाचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर मार्फत करण्यात येत आहे. |

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी कांगणे, अपर पोलीस अधीक्षक श्री.शशिकांत सिंगारे यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक, श्री. धर्मराज बांगर यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी पोलीस निरीक्षक, श्री.वाल्मीक कोरे, पोलीस हवलदार राजेंद्र जोशी, मपोह पुष्पा दराडे, आशा कुंटे, पोलीस अंमलदार युवराज हिवाळे, चालक चांगदेव बागुल यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर

ई- मेल :-1)spacbaurangabad@mahapolice.gov.in 2) dysp.acbcsn@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

पोलीस अधीक्षक :- 90110 92777 अपर पोलीस अधीक्षक :- 9923102205

पोलीस उप अधीक्षक :- 9923247986


**धर्मराज काशिनाथ बांगर**
**पोलीस निरीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग**
**छत्रपती संभाजीनगर**